




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २३६ ●मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# बाकीच्या नेत्यांची शहरं भिकार**

## बीडमधील सभेत अजित पवारांचा कोणावर निशाणा ?

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायत निवडणुकांसाठी निवडणूक होत असून आता प्रचाराच्या तोफा अंतिम टप्प्यात आल्या आहेत. स्थानिक नेत्यांच्या राजकीय भविष्यासाठी आता बडे नेतेही मैदानात उतरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार हेही निवडणुकांसाठी प्रचार दौरे करत असून आज बीड आणि नांदेड जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांसाठी त्यांनी सभा घेतल्या. यावेळी, मी कामाचा माणूस आहे, आधी करतो मग बोलतो असे म्हणत इतर नेते आणि त्यांची शहरं भिकारचोट असल्याचं अजित पवारांनी म्हटलं. मला जनतेने ६-६ वेळा उपमुख्यमंत्री केलं, विरोधी पक्षनेता केलं, मंत्री केलं. सन २०१७ नंतर २०२२ ला निवडणूका लागायला पाहिजे होत्या. पण, कोरोना आल्यामुळे उशिर झाला. यापूर्वी स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाकडे दुर्दैवाने लक्ष दिलं गेलं नाही. मी पालकमंत्री आहे, माझं लक्ष असतं, असे म्हणत स्थानिक मुद्द्यांना अजित पवारांनी ▶ उर्वरित पान २ वर

### ● बाकीचे नेते, त्यांची शहरं भिकारचोट

निवडणुकीसाठी ४ वर्षे कार्यकर्त्यांना थांबावं लागलं. या निवडणुकीतूनच कार्यकर्ता तयार होतो, म्हणून ही निवडणूक महत्वाची आहे. मी शब्दाचा पक्का आहे, माझ्यावर आरोप-प्रत्यारोप होतात पण मी स्वच्छ काम करण्याचा प्रयत्न करतो. मी माझ्या भागात करून दाखवलं तेव्हा तुमच्याकडे येऊन बोलतोय. मात्र, बाकीचे नेते, त्यांची शहरं भिकारचोट असतात, असे म्हणत अजित पवारांनी बीड जिल्ह्यातून इतर नेत्यांवर हल्लाबोल केला. अनेक पक्षाने मला उपमुख्यमंत्री पद दिलं. आता जरी आरोप करत असले तरी मागे त्यांनीच उपमुख्यमंत्री करून मला तिथे बसवलं. हे वागणं बरं नव्हं हे लक्षात ठेवा, असे म्हणत नाव न घेता अजित पवारांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांना लक्ष्य केलं.

### ● लाडकी बहीण योजनेचा अपप्रचार

आम्हाला जर मतदान केलं तरच लाडकी बहीण योजना चालू राहील, असा अपप्रचार केला जात आहे. मात्र, अशा धमक्याना घाबरू नये, हा लाडका भाऊ तुमच्या पाठीशी आहे, असा विश्वास अजित पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींना दिला. सोमवारी कंधार शहरात राष्ट्रवादीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. मला काहीजण सांगत आहेत की, आम्हाला मतदान दिलं तरच लाडकी बहीण योजना सुरु राहील, अशी कोणी भीती घालत असेल तर भीक घालू नका असे आवाहन देखील अजित पवार यांनी केले.

# नंदकिशोर मुंदडा यांच्या विजयासाठी आमदार सुनबाई सरसावल्या!

## आ. नमिता मुंदडा यांच्या दमदार प्रचार फेऱ्यांनी निवडणुकीची समीकरणे बदलली



### ● घरकुल योजनेतून निर्माण झाले आपुलकीचे नाते

आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक गोरगरिबांना घरकुलाच्या शासकीय योजनेचा लाभ मिळाला आहे. हक्काचे घर मिळाल्याने नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता वाढली आहे. त्यामुळे अनेक वृद्ध महिला, कुटुंबीय प्रचारावेळी त्यांच्या जवळ अश्रूंनी कृतज्ञता व्यक्त करताना दिसतात. या भावनिक जोडणीच्या परिणामाने जनविकास आघाडीच्या प्रचाराला वेग दिला आहे.

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहर परिवर्तन जनविकास आघाडीकडून नगराध्यक्ष पदाच्या रिंगणात उतरलेले नंदकिशोर मुंदडा हे ४७ वर्षांच्या राजकीय प्रवासात प्रथमच प्रत्यक्ष निवडणूक लढवत आहेत. प्रचंड जनसंपर्क, नागरिकांसाठी दिवसाचे २४ तास उपलब्ध राहणारी कार्यशैली आणि शहराच्या विकासातील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना मतदारांचे मोठे समर्थन मिळत आहे. दरम्यान, नंदकिशोर मुंदडा यांच्या विजयासाठी त्यांच्या सुनबाई तथा आमदार नमिता मुंदडा या सरसावल्या असून जनविकास आघाडीच्या सर्व ३१ उमेदवारांच्या प्रचाराचा भार त्यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतला आहे. नागरिकांशी जिव्हाळ्याचा संवाद आणि अथक प्रचारयात्रेमुळे आ. नमिता मुंदडा यांचा प्रचार प्रभावी ठरत असून जनविकास आघाडीला शहरभर व्यापक पाठिंबा मिळत असल्याचे चित्र स्पष्ट दिसू लागले आहे. आत्तापर्यंत त्यांनी प्रभाग ३, ९, १२, १५ मध्ये भव्य प्रचार रॅली घेतल्या तर ▶ उर्वरित पान २ वर

# प्रेमलता पारवे, मुजीब शेख यांनी धमकवल्याचा आरोप केल्याने खळबळ

## राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारावर सुनेचे केले गंभीर आरोप ;काय म्हणाल्या पहा !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्या सुनेने आज प्रसारमाध्यमां समोर येत कुटुंबातील वाद आणि मानसिक छळाबाबत गंभीर आरोप केले आहेत.

सुनबाईने भावनिक स्वरात केलेल्या विधानात सुनेने कुटुंबाकडून होत असलेल्या त्रासामुळे स्वतःला व मुलांना सुरक्षित नाही वाटत असल्याचा दावा केला आहे. तसेच काही महत्त्वाचे पुरावे स्वतःजवळ असल्याचे सांगत तिने न्याय मिळावा अशी मागणी केली आहे.



या आरोपांमुळे निवडणूक प्रचाराच्या मध्यावर पारवे परिवार आणि राष्ट्रवादी गटावर राजकीय दबाव वाढत आहे. या प्रकरणावर प्रेमलता पारवे व शेख मुजीब हे दोघे मिळून मला धमकावतात व मानसिक शारीरिक त्रास देतात, शेख हे पोलिसांना दबाव टाकून आमच्यावरच खोट्या केसेस करतात यामुळे आम्ही पूर्ण दहशतीखाली असून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे त्यांचा परिवार यांनी अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही. पक्षातील काही कार्यकर्त्यांनी हे आरोप निवडणुकीतील राजकीय डावपेच असल्याचे म्हटले आहे.


घटनेची अधिक माहिती मिळत असून पोलीसही कागदपत्रांची तपासणी करत असल्याचे समजते. पुढील काही तासांत संबंधितांची भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता आहे.मात्र पारवे यांच्या सुनेने प्रसारमाध्यमा समोर आरोप केल्याने राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. पारवे यांच्या सुनेने गंभीर आरोप करत आम्हाला न्याय द्यावा व माझ्या मुलाला परत द्यावे अशी मागणी केली आहे.

# न्यायदेवतेने अमृत काका सारडा यांना न्याय दिला

## मा. न्यायमूर्ती एस. आर. शिंदे यांनी उमेदवारी वैध असल्याचा दिला निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीडच्या विकासासाठी ३० वर्षांपासून कार्यरत असलेल्या अमृत काका सारडा यांच्या उमेदवारीला जिल्हा न्यायालयाने कायदेशीर मान्यता देत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवारी कायम ठेवण्याचा जो निर्णय दिला होता, त्यावर दाखल झालेल्या अपीलवर मा. न्यायमूर्ती एस. आर. शिंदे मॅडम यांच्या कोर्टाने सुनावणी केली आणि त्यानंतर उमेदवारी कायम ठेवण्याचा आदेश देत अमृत काका सारडा यांच्या बाजूने निकाल दिला. निवडणूक प्रक्रियेतील आवश्यक कागदपत्रांची तपासणी आणि सादर करण्यात आलेल्या मुद्द्यांच्या



आधारे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की उमेदवारी निवडणूक नियम आणि कायद्यानुसार वैध आहे. या सुनावणीदरम्यान ॲड. बालाप्रसाद जाजू यांनी कायदेशीर बाजू प्रभावीपणे मांडली. याचप्रमाणे २०१६ सालीही अमर नाईकवाडे यांनी याच पद्धतीने कैलास बीयानी यांच्यावर तक्रार केली होती, मात्र तेव्हाही त्यांची याचिका फेटाळली गेली होती.२०१६ मधील प्रकरणातील न्यायालयीन नोंदींचाही ▶ उर्वरित पान २ वर

### ● पेठ बीडच्या विकासासाठी दृढ संकल्प

अमृत काका सारडा यांनी पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या माध्यमातून अनेक वर्षे सातत्याने काम केले असून त्याममध्ये पायाभूत सुविधा, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक सहाय्य आणि नागरिकांच्या गरजांशी निगडित सेवा या क्षेत्रांत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.



*बीड नगर परिषद 'नगराध्यक्ष' पदाच्या 'आप' च्या 'झाडू' या चिन्हावरील लोकप्रिय उमेदवार सौ. वृषाली ताई नितिन जायभाये यांच्या निवडणुक २०२५ च्या प्रचाराचा शुभारंभ कंकालेश्वर यांना अभिषेक करून, तसेच सर्वधर्मीयांचे श्रद्धेचे ठिकाण 'शहेनशावली दर्गा' येथे चादर चढवून व माता टेकून करण्यात आला. यावेळी विश्वरत्न-भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून सर्व महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.*

# पिस्तुल्या संदीप ऊर्फ रमेश इंगोले यास पिंपळनेर पोलिसांनी केली अटक

**बीड । प्रतिनिधी**

अवैध गावठी पिस्तुल बाळगून वायभटवाडी चौकामध्ये दहशत माजवणाऱ्या संदीप ऊर्फ रमेश महादेव इंगोले, वय ३३ वर्षे, रा. बार्शी नाका.यास सपोनि मधुसुदन घुगे यांना आरोपी पिस्तुल बाळगून वायभटवाडी चौकातील लोकांना धमकावत आहे. त्याने फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने गावठी पिस्तूल डोक्याला लावले व धमक्या दिल्या. असल्याची माहिती मिळाल्यावर सपोनि मधुसुदन घुगे व पोलीस स्टाफ बीड बायपास येथे गेले आणि त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले.



जप्त मुद्देमाल: आरोपीच्या ताब्यात एक अवैध गावठी पिस्तुल, एक जिवंत काडतुस आणि स्कॉरपिओ क्र. एम.एच.२३बीबी ५५०५ हे वाहन मिळून आले.

फिर्यादीचे नाव: यशराज रामा जाधव, वय १९ वर्ष, रा. वायभटवाडी, ता.जि.बीड.

गुन्हा नोंद: फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे गु.र.नं. ३३०/२०२५, कलम १०९, ३५२, ३५१ (२) भारतीय न्याय संहिता ▶ उर्वरित पान २ वर

# परळीला बदनाम करणाऱ्यांना जनता मतरुपी आशीर्वाद देऊन उत्तर देईल : धनंजय मुंडे

## महायुती मिळून परळीला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यासाठी सहकाऱ्यांनी सज्ज व्हावे : धनंजय मुंडेंचे पदाधिकारी कार्यकर्त्यांना आवाहन

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळीच्या मातीतील जनतेची सेवा आणि विकास हाच आपला ध्यास ठेवून मागील अनेक वर्ष आम्ही काम करत आलो आहोत, मागील काही कार्यकाळ नगरपरिषदेत प्रशासक होता, मात्र तरीही विकास कामांसाठी निधी खेचून आणण्यात कुठेही कमी पडलो नाहीत. परंतु गेल्या काही महिन्यात राजकीय स्वार्थापोटी काही लोकांकडून परळीची राज्यात जी बदनामी करण्यात आली, तिचे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी परळीतील जनता महायुतीच्या नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवारांच्या पाठीशी मतदान रोपे आशीर्वाद उभा करून भरघोस मतांनी विजयी करून देईल, असा विश्वास माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते आमदार धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केला.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीच्या अधिकृत उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह युतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आज महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संयुक्त कार्यकर्ता मेळावा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे सह आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता, या वेळी श्री. मुंडे बोलत होते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना श्री धनंजय मुंडे म्हणाले की मी माझ्या जीवनात कोणतीही निवडणूक ▶ उर्वरित पान २ वर

## परळीत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ संयुक्त कार्यकर्ता मेळावा




## शेवटच्या माणसापर्यंत विकास पोचला पाहिजे, मी व धनु भाऊ मिळून त्यासाठी एकत्रित काम करू : ना. पंकजाताई मुंडे

### ● महायुतीचे अधिकृत उमेदवार

- ▶ नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी
- ▶ प्रभाग क्रमांक 1 अ चे उमेदवार वंदना अश्विनकुमार आघाव, प्रभाग क्रमांक 1 ब चे उमेदवार दीपक प्रल्हादराव मुंडे
- ▶ प्रभाग क्रमांक २ अ चे उमेदवार कविता अनंत इंगळे, प्रभाग क्रमांक २ ब चे उमेदवार अल्ताफ सुरदार खान
- ▶ प्रभाग क्रमांक 3 अ चे उमेदवार शेख हुसेना बी अमीन, प्रभाग क्रमांक 3 ब चे उमेदवार शेख अजीम मुजीब
- ▶ प्रभाग क्रमांक ४ अ चे उमेदवार नितीन नामदेव रोडे,प्रभाग क्रमांक ४ ब चे उमेदवार शांता मुंजा नाईकवाडे
- ▶ प्रभाग क्रमांक ५ अ चे उमेदवार सौ.जयश्री शंकराप्पा मोगरकर, प्रभाग क्रमांक ५ ब उमेदवार वैजनाथ भानुदास सोळंके
- ▶ प्रभाग क्रमांक ६ अ चे उमेदवार बनसोडे अंजली केशवराव , प्रभाग क्रमांक ६ ब चे उमेदवार व्यंकटेश बाबुराव शिंदे ▶ उर्वरित पान २ वर

# महिलांवरील हिंसाचार आणि सामाजिक वास्तवता

२५ नोव्हेंबर, म्हणजेच (International Day for the Elimination of Violence Against Women) महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिनाच्या पार्श्वभूमीवर, भारतातील महिलांवरील गुन्ह्यांविषयीचा ताजा अहवाल समजून घेणे गरजेचे आहे. National Crime Records Bureau (NCRB) यांनी प्रसिद्ध केलेल्या "Crime in India 2023" या अहवालात दाखवले आहे की या देशात महिलांविरुद्ध घडत असलेल्या घटनांचा केवळ कायद्याचा प्रश्न नसून ते सामाजिक संरचना, संस्कृती, आर्थिक व राजकीय परिस्थिती यांच्याशी खोलवर गुंतलेले आहेत. अहवालानुसार वर्ष २०२३ मध्ये महिलांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या ४,४८,२११ इतकी झाली आहे, जी २०२२ च्या ४,४५,२५६ पेक्षा किंचित अधिक आहे. या संख्या दर्शवतात की अशा गुन्ह्यांची वाढ थांबलेली नाही, उलट ती घटलेल्या नसून वाढत्या रूपात आहे. राष्ट्रीय पातळीवर प्रति लाख महिला लोकसंख्येमागील गुन्ह्यांचा दर ६६.२ इतका होता.

या आकड्यांचा सामाजिक अर्थ असा आहे की महिलांचे वैयक्तिक जीवन, कौटुंबिक संबंध, सार्वजनिक स्थान हे सर्व असुरक्षिततेच्या छायेखाली आहेत. NCRB अहवालात सर्वात मोठा गुन्हा प्रकार नोंदवलेला आहे तो म्हणजे "पती किंवा त्याच्या नातेवाईकांद्वारे क्रूरता" (Cruelty by husband or his relatives) हा प्रकार अजूनही महिलांविरुद्ध होणाऱ्या अधीकृत गुन्ह्यांत सुमारे २९.८% पर्यंत आहे. याचा अर्थ असा की महिलांचे हिंसाचारातील मुख्य माध्यम हे बऱ्याच वेळा घरी, नातवंडीत, विश्वासाच्या परीघातच आहे. जेथे ती सुरक्षित असावी, त्या ठिकाणी तिच्यावर अत्याचार होतो. हे सामाजिक दृष्टीने अत्यंत चिंताजनक आहे कारण ते लिंगआधारित असमानता व पारंपरिक लिंगभूमिकांचे प्रतीक आहे.

राज्यस्तरावर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची दिसते. उदा. उत्तर प्रदेशमध्ये २०२३ मध्ये महिलांविरुद्ध गुन्ह्यांची सर्वाधिक संख्या नोंदवली गेली आहे. काही राज्यांमध्ये प्रति लाख महिला किंवा एकूण किती प्रकरणे हाताळली जातात यातील फरक हा सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय भिन्नतेचा परिणाम आहे. बहुधा, ज्या ठिकाणी सामाजिक जागृती कमी आहे, पोलीस-तपासणे व नोंदणीचे यंत्रणा कमजोर आहेत, तिथे वास्तव घटना अजून जास्त असतात पण नोंद होतात कमी होते. हेही लक्षात घ्यावे लागेल की अधिक संख्या म्हणजे केवळ असुरक्षिततेचा वाढता प्रमाण नाही, तर ती त्या प्रदेशात महिलांना तक्रार करण्याचा भराव अधिक झाला आहे, असेही सांगू शकते म्हणजे कि नोंद वाढणे म्हणजे सामाजिक जागृतीचा दिवा पण असू शकतो.

समाजशास्त्रीय दृष्ट्या, महिलांवरील हिंसाचाराचे कारण केवळ वैयक्तिक असंतुलन, व्यक्तिगतरूपी आव्हाने किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच नाही; हे सामाजिक-संस्कृती, आर्थिक असमानता, आणि लिंग-वाद्य संरचनांचा परिणाम आहे. उदा. अनेक सामाजिक संस्कृतीत महिलांना आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबित्व असणे, तिच्या अक्षमता किंवा निर्बलतेची धारणा असणे, आणि तिच्या सशक्त स्वरूपाला विरोध असणे अशा विविध पद्धतीने हिंसाचाराचा पाया घालतात. घरी पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून होणारी क्रूरता यामागे 'पतीचा अधिकार' किंवा 'घर चालवायची जबाबदारी' अशा जुनाट लिंगभूमिका वचनबद्ध असतात. अशा भूमिकांमध्ये महिला म्हणजे 'अधिकाऱ्याच्या मुलगी' किंवा 'घरच्या कामासाठी' अशी विशेष भूमिका बजावावी, अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा तिच्या स्वायत्ततेशी, निर्णय-स्वातंत्र्याशी, सामाजिक सहभागाशी छेडछाड करते. त्यामुळे तिच्या अस्तित्वाच्या विविध पैलूंवर म्हणजेच आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक दबाव निर्माण होतो.

तसेच, हिंसाचाराचे स्वरूप बदलत चालले आहे. जरी अहवालात बलात्कार, किडनॅपिंग / अपहरण या प्रकारातील गुन्ह्यांमध्ये काही प्रमाणात घट दिसली असली तरी, ऑनलाईन हिंसा, सायबर छळ, तसेच सार्वजनिक व खाजगी ठिकाणी छेडछाडी यांसारखे प्रकार वाढण्याचा धोका दाखवतात. या बदलत्या स्वरूपामुळे पारंपरिक सुरक्षात्मक उपाय पुरेसे नाहीत, नवे धोके ओळखण्यासाठी सामाजिक-संस्थात्मक प्रतिसाद बदलावा लागणार आहे.

NCRB अहवालानुसार, गुन्ह्यांची संख्या जरी थोडी वाढली असली तरी प्रक्रियात्मक कामगिरी अजून अपूर्ण आहे. उदा. देशातील चार्जशीटिंगचे प्रमाण २०२३ साली ७७.६% इतके होते. म्हणजे गावापासून महानगरापर्यंत पोलीस तपासणे व न्यायालयीन निकालप्राप्ती यामध्ये मोठा अंतर आहे. न्यायप्रक्रियेत होणारी अतिस्थिरता, प्रलंबित प्रकरणे, पीडितांच्या बाजूने सुरक्षात्मक उपायांची कमतरता हे सर्व महिलांच्या हिंसाचारविरुद्ध लढ्यात मोठे अडथळे आहेत. सामाजिक दृष्ट्या हे दाखवते की कायदा-व्यवस्था बदलण्यापुरती नाही, त्याबरोबर सामाजिक चेतना वाढवणे, समुदायांना जागरूक करणे आणि महिलांचे सकारात्मक बदल घडवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

एखाद्या समाजशास्त्रीय आराखड्यातून बघितले, तर महिलांवरील हिंसाचार तीन प्रमुख स्तरावर समोर येतो. व्यक्तिगत, संबंधात्मक आणि संरचनात्मक. व्यक्तिगत स्तरावर म्हणजे एखादी महिला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अनुभवते ते; संबंधात्मक स्तर म्हणजे तिच्या कौटुंबिक, वैवाहिक, नातेवाईक परस्पर संबंधात होणारी हिंसा; आणि संरचनात्मक स्तर म्हणजे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थिती जे तिच्या असुरक्षिततेला जन्म देतात. NCRB 2023 च्या आकड्यांत या सर्व स्तरांचे प्रतिबिंब दिसते. उदा. पती-नातेवाईकाद्वारे क्रूरतेचे प्रमाण जास्त हे संबंधात्मक स्तरावरची समस्या दर्शवते; राज्यांमध्ये फरक हे संरचनात्मक असमानतेचा परिणाम आहे.

या संदर्भात पुढे विचार करावा लागेल की महिलांना सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण देण्याऐवजी फक्त कायदे बनवणे पुरेसे नाही. साक्षरता, आर्थिक स्वावलंभ, सुरक्षित सार्वजनिक ठिकाणे, गर्दीपासून दूर चालण्यायोग्य रस्ते, रात्री महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हे सर्व उपाय आवश्यक आहेत. महिलांना निर्णय प्रक्रियेत भाग घेता यावे, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, ग्रामसभेतील निर्णय-प्रक्रिया, स्थानिक वाहिनींमध्ये महिला नेतृत्व वाढावे. त्यांनी स्वतःच्या जगण्याचा अनुभव बदलावा आणि समाजाने त्या बदलाला पाठिंबा द्यावा. ही प्रक्रिया वेगवान करण्यासाठी शाईप्रेरित कार्यक्रम, लोकशिक्षण, माध्यमांमाध्यमातून पुन्हा पुन्हा जनजागृती, स्त्री-पुरुष समता हे संदेश देण्यासाठी प्रभावी उपाय आवश्यक आहेत.

शिक्षणाच्या क्षेत्रातही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बालविवाह बंद करण्यासाठी, लिंग-आधारित भेदभाव विरुद्ध लढण्यासाठी, लैंगिक समानतेचा भाव जागवण्यासाठी शाळांमध्ये नियमितपणे कार्यक्रम असावेत. तेथील शिक्षक-शिक्षिका, शाळांतील विद्यार्थी हे बदलाचे ध्रुव असू शकतात. समाजातील जुनाट लिंग-भूमिकात्मक अपेक्षांना प्रश्न विचारण्याची, महिलांना स्वावलंबी बनवण्याची जबाबदारी सर्वत्र आहे. घरी, शाळेत, सार्वजनिक ठिकाणी आणि माध्यमांमध्ये.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक**

◆ पान ४ वरून पुढे...

## नात्यातील मुलाने...

गुन्हा नोंद करण्यात विलंब करणे हीसुद्धा कायदेशीर गुन्हा ठरतो. त्यामुळे शिरूर कासार पोलिसांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. कांबळे यांनी पुढे हेही सांगितले की, नातेवाईक आणि गावकरी दोघांनीही गुन्हा न दाखल करण्यासाठी आईवर प्रचंड दबाव टाकला होता, परंतु आईने हार न मानता तक्रार नोंदवली. त्यांनी एक वास्तवही सांगितले– अशा ९० टक्के प्रकरणांत दबावामुळे पीडित कुटुंबांना पोलीस स्टेशनपर्यंत येऊ दिले जात नसल्याचीही कांबळे यांनी स्पष्ट केलं.

## स्मिता विष्णू....

दिनकर बोराडे,अरुण सवाई, ज्ञानोबा माने, दीपक चौगुले, नितीन सोनवणे, उत्तमराव पवार, सत्यनारायण ढाका, अनुरथ वीर, मायाताई मिसळे, आम्रपाली साबळे, भगवान कांडेकर, सिद्धार्थ शिंनगारे, नितीन वाघमारे, यांच्यासह आंबेडकरी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी स्मिता विष्णू वाघमारे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

बीड नगर परिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक समाज बांधवांच्या स्वाभिमानाची निवडणूक असून मागासवर्गीय उमेदवारासाठी आरक्षित असलेल्या नगर अध्यक्षपदासाठी अनुसूचित जातीच्या समाजाच्या जागेवर आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन भू-माफिया, रेती माफिया व गुटखा माफिया यांच्या ताब्यात बीड नगर परिषद देण्यासाठी व आपल्याला संविधानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आरक्षणाच्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम करणाऱ्या अजित पवार यांच्यासह अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या निर्णयाला नेस्तनाबूत करण्यासाठी समाजाची एकजूट महत्वाची आहे. बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत आंबेडकरी समाज बांधवांनी राजकीय ताकद निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाच्या घड्याळ या चिन्हाच्या उमेदवाराला पराभूत करून, स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांनी बैठकीत निर्णय घेवून केला. या निर्णायक बैठकीस राजू जोगदंड, आशिष चव्हाण, भास्कर सरपते, यशवंत कदम,किसन तांगडे, सुभाष लोणके, अशोक ठोकळ, रवी वाघमारे, हनुमंतराव कांबळे, डी.जी वानखेडे, गौतम सोनवणे, प्रा. बाळासाहेब वाघमारे, प्रा. विठ्ठल गाडे, प्रा. सिरसाट, आदमाने, रमेश माटे, शाहू डोळस, नाना मस्के, महेश आठवले, अनिल बोराडे, संगीता वाघमारे, अरुणाताई आठवले, रेश्माताई जोगदंड, अनिताताई डोंगरे, शोभा गलांडे, शेख भाभी, सुभाष तांगडे, ॲड.सुरेश वडमारे, ॲड. तेजस वडमारे, ॲड. देवत्त शिंदे, ॲड. राहुल साळवे, ॲड. अशोक वाघमारे, ॲड.दीपक ससाणे, सुर्यकांत जोगदंड, मधुकर लोंढे, अशोक वीर, प्रकाश वक्ते, बंडू विसर्जन अविनाश जोगदंड प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, नागेश दुबळे, विलास जोगदंड,

◆ पान ४ वरून पुढे...

संजय हनवते, भारत कांबळे, भैय्या साळवे, गौतम धन्वे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कांबळे, महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, भैय्या मस्के, रतन वाघमारे, नामदेव वाघमारे, सतीश शिनगारे, शाम वीर, गौतम कांबळे, सोनू वडमारे, यांच्यासह बीड शहरातील आंबेडकरी संघटनांचे सर्व पक्षी पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधव या निर्णायक बैठकीस हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

## अजित दादा....

अजितदादा बीडमध्ये जनतेला प्रेमलता पारवे यांच्या माध्यमातून बीडची बारामती करण्याचे स्वप्न दाखवत भाषण ठोकत आहेत. व्हायरल झालेल्या युट्युब चॅनेल मध्ये सुनेने मांडलेली कैफियत हृदयाला पाझर फोडणारी आहे. प्रेमलता पारवे यांनी आपला मुलगा सत्यजित पारवे यांचा विवाह २०१२ मध्ये करून दिला. विवाह झाल्यानंतर घरात आलेल्या नव्या सूनेवर थोडाफार अत्याचार सुरूच होता. मुलगा झाल्यानंतर तरी परिस्थिती सुधारेल त्रासातून सुटका होईल अशी अपेक्षा होती पण ती फोल ठरली. सुनेने आपल्या पतीला ड्रिंक सह बाहेरचे नाद आहेत. यामुळे त्यांना किडनी विकार सुरू झाला. याच्यावर उपचार करण्यासाठी लागणारा खर्च तुझ्या आईकडून घेऊन ये असं सांगून मारहाण करण्यात आली. माझी आई गरीब टेलर काम करुन पोट भरणारी असल्याने पैसा देणं शक्य नव्हतं. एक दिवस मला घरातून बाहेर काढलं. याप्रकरणी न्यायालयात पाच वर्षापासून न्यायासाठी लढा देत आहे. प्रेमलता पारवे न्यायालयाने वॉरंट काढलं असलं तरी एकदाही न्यायालयात फिरकल्या नाहीत. आश्रयासाठी मामाच्या घरी राहात होते. मात्र कोरोना काळात मामांचं निधन झालं. त्यानंतर माझ्यापासून मुलाला मारहाण करून घेऊन गेले. न्यायालयाने मुलाची जबाबदारी माझ्यावर सोपवली असली तरी तो माझ्याकडे सोपवायला प्रेमलता पारवे तयार नाहीत अशी करुण कहानी सांगितली. तुझे तुकडे करून मारून टाकू अशा धमक्या एका स्थानिक सायं दैनिकाच्या संपादकाच्या जीवावर करत असल्याचा आरोप देखील प्रेमलता पारवेंच्या सुनेने केला आहे. कोरोना पासून मी माझ्या मुलाला पाहिलं देखील नाही असं म्हणून हृदय पिळवटल जाईल असा आक्रोश देखील या सुनेने केला. एवढेच नाही तर प्रेमलता पारवे यांच्या मोठ्या मुलाचे देखील दोन लग्न झालेली आहेत. या सुनांना देखील असाच त्रास दिला जात असल्याचे देखील तिने सांगितलं. विशेष म्हणजे प्रकरण एवढं मोठं असून देखील पेठ बीड पोलिसांनी या पिडीत सुनेची तक्रार घेण्याची तसदी वाटली नाही. हे बीडच्या पोलीस दलाचं कार्य कर्तुत्व आहे. माध्यमांमध्ये हे प्रकरण गाजत असताना अजित पवार मात्र बीडच्या जनतेला विकासाची स्वप्न अशा लोकांच्या जीवावर दाखवत आहेत. अजित दादा! ज्या प्रेमलता पारवे स्वतःच्या सुनेला छळत असतील त्या बीडच्या जनतेला न्याय वागणूक कशा देतील? विकास स्वतःचा करतील की जनतेचा? राजेंद्र हगवणेच्या सुनेने देखील कौटुंबिक छळाला कंटाळून

◆ पान ४ वरून पुढे...

आत्महत्या केली होती ते प्रकरण अजूनही जनता विसरलेली नाही तो तुमच्याच पक्षाचा होता. प्रेमलता पारवे देखील तुमच्याच पक्षाच्या उमेदवार आहेत. अशी माणसं निवडून बीडकरांच्या माथी तुम्ही मारणार आहात का? प्रेमलता पारवे निवडून आल्यानंतर माझ जगणं अवघड करतील. जीवे मारण्याच्या धमक्या यापूर्वी देखील त्यांनी दिल्या आहेत. धमक्याप्रमाणेच माझं जगणं देखील अवघड केलं आहे.मग अजित दादा वैष्णवी जिवानिशी गेली. पारवेंची सून जिवंत आहे. दोन्ही प्रकरणामधला फरक एवढाच आहे. मग पारवेंच्या सुनेच्या जीवाचं बरं वाईट होण्यासाठी बीडकरांनी तुमच्या पक्षातील लोकांच्या पापात का सहभागी व्हायचं?बीडचा गुन्हेगारीचा आलेख आणखी वाढवायचा आहे का? तुमच्या पक्षाला वारंवार बीडच्या जनतेने साथ दिली.ती बीडकरांची चूक आहे का ? असे एक ना अनेक प्रश्न विचारले जात आहेत. दादांच्या आजच्या भाषणातील हवा वाफे सारखी हे प्रकरण पुढे आल्यानंतर विरून गेली आहे.

## भ्रष्टाचाराचा आहार...

कुपोषण बंद करून विकासाचं पोषण आपल्याला संध्या मेंडकेला माजलगाव नगर परिषदेचा नगराध्यक्ष बनवून करायचा आहे. हे शक्ती युग आहे.कलियुगाचा घोर शेवट जेव्हा होतो त्यावेळेस शक्तिगाची सुरुवात होते.ही नारी शक्ती आहे.समाजात पसरलेली सर्व घाण नारीशक्ती साफ करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान भारतीय जनता पार्टीने केलेल्या विविध योजनांवर त्यांनी प्रकाश टाकून लाडक्या बहिणींचा सन्मान करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.डॉ. आनंदगावकर,अमरनाथ खुरपे, संपादक शिवाजी रांजणन यांनीही आपले मनोगत पर भाषणे केली. यावेळी सभेला महिला भगिनींसह नागरिकांची मोठी गर्दी होती.

## बाळनाथ विद्यालय ...

निर्णायक क्षणी त्यांनी दाखवलेली खेळकौशल्ये पाहून सर्व प्रतिस्पर्धी संघांना मागे टाकत त्यांनी महाराष्ट्रात विजेतेपद मिळवले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल चारही खेळाडूंचे सर्वत्र कौतुकाचे व अभिनंदनाचे संदेश सुरू आहेत.या सर्व मुलींना प्रशिक्षक श्री. विजयकुमार नखाते सर यांचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या मेहनतीमुळे संघाने उच्च दर्जाची कामगिरी साधली, असे मत खेळाडूंनी व्यक्त केले. आज बाळनाथ विद्यालयात मुख्याध्यापक आदरणीय जगताप सर यांच्या हस्ते खेळाडू, विजयी मुलांचे आई-वडील व शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांचे सततचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मोलाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने पाठबळ देण्याची ध्येयवेड डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या नेतृत्वातून दिसून येते. राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेत विद्यार्थिनींनी

◆ पान ४ वरून पुढे...

मिळवलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. ज्योतीताई मेटे यांनी खेळाडू, प्रशिक्षक व शाळेचे अभिनंदन करत पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या आवारात या विजयानंतर आनंदाचा माहोल पाहायला मिळाला असून गावकऱ्यांपासून पालकांपर्यंत सर्वत्र अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

## कुक्कडगाव येथील...

त्यांची हिम्मत होत नव्हती परंतु ज्या वेळेस पूजा मॅडम पिंपळनेर पोलीस स्टेशनचे त्यांचे प्रशासकीय काम झाले त्यावेळेस त्या बीडला गेल्या नंतर त्या आता पोलीस उपाधीक्षक म्हणून बीडमध्ये सध्या कार्यरत आहेत त्यांनी देखील या भागातील सर्व परिसराचा अभ्यास केलेला आहे आता पोलीस उपाधीक्षक पूजा पवार मॅडम यांनी देखील या परिसरामध्ये अवैध धंद्याच्या बाबतीत लक्ष देणे गरजेचे आहे आणि अशा वाळू माफिया यांच्यावर व गुटखा माफिया यांच्यावर व अवैध धंदे करणाऱ्या वर बेधडक कारवाई करणे गरजेचे असल्याचे सध्या या भागातील नागरिकांमधून बोलले जात आहे म्हणून पोलीस अधीक्षक साहेब आपण स्वतः लक्ष देऊन आपल्या पोलीस उपाधीक्षक उपविभागीय अधिकारी पूजा पवार मॅडम यांना या भागामध्ये वाळू माफिया वर कारवाई करण्याचे आदेश कधी देणार आहेत याची या भागातील सर्व लोक वाट पाहत आहेत.

## मराठवाड्यातील स्थानिक...

झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. दलित समाजातील आणि वंचित समाजाला न्याय मिळाला पाहिजे, त्यांच्या अन्यायाच्या विरोधामध्ये भीम आर्मी लढते आहे आणि लढणार आहे. आदिवासी पाड्यातील सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील अन्यायाच्या विरोधात भीम आर्मी रणांगणात उतरलेली आहे. या सर्वांना न्याय मिळवण्यासाठी लोकप्रतिनिधी राजकीय क्षेत्रामध्ये आवाज उठवतील या दृष्टीने भीम आर्मीने प्रथमच या निवडणुकीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय जाहीर केला आहे, विश्वनाथ शरणागत यांनी आपली भूमिका निभावून पुढील अहवाल राज्य कार्यकारणीकडे जाहीर करावा, असेही महादू पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

## ऊस दरवाढीवरून...

नोव्हेंबर २०२५ मंगळवार रोजी बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यासोबत कारखान्याच्या एमडी सोबत युवा शेतकरी संघर्ष समिती यांच्यात ऊसदरावरून बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. परंतु या बैठकीतून जोपर्यंत ऊसदराबाबत ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत कोयता बंद राहील असे या आंदोलनाच्या समारोप प्रसंगी युवा शेतकरी संघर्ष समिती कडून सांगण्यात आले आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## बाकीच्या नेत्यांची...

हात घातला. बीडमध्ये आपण रेल्वे सुरू केली आहे, ती रेल्वे आपल्याला पुण्यापर्यंत आणि मुंबईपर्यंत न्यायची आहे. त्याशिवाय माझ्या बीड जिल्ह्याचा आणि अंबाजोगाईचा विकास होणार नाही. १००० कोटी रूपये निधी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयासाठी देणार , असल्याची घोषणाच अजित पवारांनी अंबाजोगाईतून केली.

## नंदकिशोर मुंदडा...

प्रभाग ४, ६, ७, १०, १४ या ठिकाणी कॉर्नर बैठका पार पाडल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून महिला, युवक आणि ज्येष्ठ मतदार त्यांच्याभोवती मोठ्या संख्येने गोळा होत आहेत. मोठ्या पदावर असूनही साधी राहणी, सहज लोकांमध्ये मिसळण्याचा गुण आणि प्रत्येक मतदाराशी असलेली नाळ यामुळे त्या शहरात लोकप्रिय आहेत. सासूबाई, माजी मंत्री स्व. विमलताई मुंदडा यांच्या साधेपणाची आणि जनसेवेची परंपरा त्यांनी पुढे नेली आहे. नमिता मुंदडा या आपल्या भाषणांमधून मागील काही वर्षांत नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या विकासकामांचा आढावा नागरिकांसमोर ठेवतात. शहरातील सर्वत्र झालेले सिमेंट कॉंक्रीट रस्ते, उद्याने, देवस्थाने आणि प्राचीन स्थळांचा विकास, विविध समाजांच्या स्मशानभूमीची उभारणी, तसेच शहरासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या २०६ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेची प्रगती याचा आढावा त्या नागरिकांसमोर ठेवतात. अनेक प्रकल्प पूर्ण झाले असून उर्वरित कामे जलद गतीने सुरू असल्याचे त्या नागरिकांना पटवून सांगतात. यापूर्वी विकासकामे करताना नगरपालिकेच्या माध्यमातून विरोधकांनी केलेली आडकाठी लक्षात घेता प्रगतीपथावर असलेली आणि प्रस्तावित विकासकामे पूर्ण करण्यासाठी शहराला नंदकिशोर मुंदडा यांच्यासारख्या सशक्त आणि विकासाची दृष्टी असलेल्या नेतृत्वाची गरज असल्याचे त्या पटवून सांगतात. त्यांचा हा प्रचार अतिशय प्रभावी ठरत असून वाढत्या पाठींब्यामुळे या निवडणुकीत नंदकिशोर मुंदडा आणि शहर परिवर्तन जनविकास आघाडीच्या सर्व ३१ उमेदवारांची बाजू दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असल्याचे दिसते आहे.

## न्यायदेवतेने अमृत...

◆ पान ९ वरून पुढे...

या प्रक्रियेत संदर्भ देण्यात आला आणि त्या आधारेही उमेदवारी योग्य असल्याचे न्यायालयाने स्वीकारले.अमृत काकांच्या बाजूने निकाल दिला. अमृत काका सारडा यांच्या बाजूने ॲड. बालाप्रसाद जाजू,ॲड. राधेश्याम जाजू यांनी बाजू मांडली. तर अमर नाईकवाडे यांच्या बाजूने उच्च न्यायालयाचे ॲड. सय्यद तौफिक यांनी बाजू मांडली. पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या माध्यमातून जात, पात, धर्म न पाहता हजारो नागरिकांच्या सुख-दुःखात उभे राहणारे, विकासाचे काम प्रत्यक्षात करणारे आणि लोकांचा विश्वास जिंकलेले अमृत काका हे या निवडणुकीत आघाडीवर आहेत हे चित्र स्पष्ट झाले आहे.

## पिस्तुल्या संदीप....

सह कलम ३/२५ भा.हा. कायदा सह कलम १३५ म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सध्याची स्थिती: आरोपी सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे. मार्गदर्शक अधिकारी: पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार. कारवाई करणारे पथक: सपोनि श्री. मधुसुदन घुगे, पोउपनि श्री. अर्जुन गोलवाल, पोह/८५५ आबुबकर शेख, पोह/२१०७ बांगर, पोशि/२२७३ सादेक पठाण, चा.पोह/१४४८ महेश गर्जे (सर्व पो.स्टे पिंपळनेर). पोलीस अधीक्षकांचे संकेत: भविष्यातही सराईत गुन्हेगारांवर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तात्काळ कार्यवाही करून त्यांना अटक करण्याचे निर्देश श्री. नवनीत काँवत व श्री. सचिन पांडकर यांनी दिले आहेत.

## परळीला बदनाम...

कधीच हलक्यात घेत नाही किंवा सोपी समजत नाही. आपणही या निवडणुकीला सोपे न समजता प्रत्येक मतदाराच्या घरापर्यंत पोहोचून आपल्या विकासाचे विजन मांडण्याची आणि शंभर टक्के मतदान करून घेण्याची जबाबदारी ही सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व सहकाऱ्यांची आहे. राज्यात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपाचे चित्र असताना सुद्धा परळी नगर परिषदेत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) अशी स्पष्ट महायुती एकत्रित लढत असून योग्य पद्धतीने जागावाटप करण्यात आले असून सर्वांनी एकत्रित महायुती म्हणून एकमेकांना सोबत घेऊन चालावे,

◆ पान ९ वरून पुढे...

अनेक विषयातील आपसातील मतभेद किंवा अन्य कोणत्याही असयुक्तिक बाबींचा निवडणुकीवर परिणाम होणार नाही याची कार्य काळजी सर्वपक्षीय सहकाऱ्यांनी घ्यावी असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

दरम्यान माझ्यासह धनंजय मुंडे यांच्या कार्य काळामध्ये परळी वैद्यनाथ शहरांमध्ये कृषी महाविद्यालय, पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय यासारख्या अनेक शासकीय शिक्षण संस्था उभ्या राहत असून आगामी काळात परळी विद्यानगरी होईल त्यालाच अनुसरून शहरांमध्ये आर्थिक उलाढाल देखील वाढेल, यातूनच विकासाला देखील गती प्राप्त होईल. विकास पोहोचला पाहिजे, असे ब्रीद हाती घेऊन स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी परळीच्या विकासासाठी काम केले. त्याचाच वसा घेऊन पुढे शेवटच्या माणसाच्या विकासासाठी शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहू आणि विकासाचे शहर अशी ओळख परळी शहराला करून देऊ असे मत पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

निवडून येणाऱ्या नगरसेवकांनी नेहमी गरिबांची कामे करावीत, गरिबांना कोणतीही जात नसते त्यामुळे नगरसेवकाची कामे दररोज जनता दरबार भरवल्याप्रमाणे दिसले पाहिजे अशी अपेक्षाही मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त करून दाखवली. तीर्थक्षेत्र विकास आराखडा सह परळी शहरात अनेक विकासाची कामे सुरू आहेत तसेच अनेक कामे प्रस्तावित आहेत, वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत सुरू असलेली कामे येत्या वर्षभरात पूर्ण करायची आहेत. त्यासाठी विकासाचे व्हिजन असलेले लोक प्रतिनिधित्व करणे गरजेचे आहे, असेही धनंजय मुंडे याप्रसंगी म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी केले, तसेच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह शिवसेनेचे तालुकाध्यक्ष व्यंकटेश शिंदे, रिपाइंचे सचिन कागदे, राष्ट्रवादीचे प्रा. विनोद जगतकर, भाजपचे जुगलकिशोर लोहिया यांनीही याप्रसंगी आपले मत व्यक्त केले.

व्यासपीठावर ना. पंकजाताई मुंडे, आ. धनंजय मुंडे, जुगलकिशोर लोहिया, शांतीलाल जैन, विजय वाकेकर, अजय मुंडे, अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य तय्यब भाई शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. मधुकर आघाव, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष व्यंकटेश शिंदे, रिपाइंचे सचिन कागदे, भाजपच्या

◆ पान ९ वरून पुढे...

शहराध्यक्ष उमाताई समशेट्टी काकी, सुरेश टाक, आयुब भाई पठाण विनोद जगतकर, संदीप लाहोटी, आर. एच. वावळे, निळकंठ चाटे, वैजनाथ माने, अरुण टाक, प्रकाश जोशी, अजीज कच्ची, रवींद्र परदेशी, राजेंद्र सोनी, श्रीहरी मुंडे, राम कुलकर्णी, महादेव इटके शरद मुंडे, तुळशीराम पवार, नितीन कुलकर्णी, पी. एल. कराड, सुनील नाना फड, यांसह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवार उपस्थित होते. यावेळी अपक्ष उमेदवारी दाखल केलेल्या वहाब कुरेशी, रवी मुळे तसेच बुंदेले यांनी संबंधित प्रभागातील महायुतीच्या उमेदवारांना आपला जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

### ● महायुतीचे अधिकृत उमेदवार....

- प्रभाग क्रमांक ७ अ चे उमेदवार सौ.उषा किशोर केंद्रे , प्रभाग क्रमांक ७ ब चे उमेदवार सचिन रामनाथ सारडा
- प्रभाग क्रमांक ८अ चे उमेदवार महानंदा रामभाऊ वावळे,प्रभाग क्रमांक ८ ब उमेदवार शकील कुरेशी
- प्रभाग क्रमांक ९ अ चे उमेदवार सुनील भाऊसाहेब कांबळे प्रभाग क्रमांक ९ ब चे उमेदवार पठाण कौसर राजाखान
- प्रभाग क्रमांक 10 अ चे उमेदवार सरोजा गौतम डावरे प्रभाग क्रमांक 10 ब चे उमेदवार महेश गोविंदराव मुंडे प्रभाग क्रमांक 10 क चे उमेदवार कुसुम अण्णासाहेब चाटे
- प्रभाग क्रमांक ११ अ चे उमेदवार महादेव नागनाथ रोडे , प्रभाग क्रमांक ११ ब चे उमेदवार जयश्री रवींद्र मुंडे गित्ते (बिनविरोध,)
- प्रभाग क्रमांक १२अ चे उमेदवार सौ.प्राजक्ता भाऊसाहेब कराड, प्रभाग क्रमांक १२ ब चे उमेदवार योगेश विजयकुमार मीनकुदळे
- प्रभाग क्रमांक १३ अ चे उमेदवार रेश्मा केशव बळवंत (बिनविरोध) प्रभाग क्रमांक १३ ब चे उमेदवार सौ.शिल्पा जयपाल लाहोटी
- प्रभाग क्रमांक १४ अ उमेदवार पवनकुमार महादेव मुंडे, प्रभाग क्रमांक १४ ब चे उमेदवार डॉक्टर पूजा प्रितेश तोतला
- प्रभाग क्रमांक १५ चे अ उमेदवार प्रतीक्षा रणजीत देशमुख ,प्रभाग क्रमांक १५ ब चे उमेदवार शेख आफ्रिन बेगम अन्वर
- प्रभाग क्रमांक १६ अ चे उमेदवार सारिका सुशील हरंगुळे १६ ब चे उमेदवार तक की उल्हासूद उल्लाह खान
- प्रभाग क्रमांक १७अ चे उमेदवार रूपाली रमेश पवार प्रभाग क्रमांक १७ब चे उमेदवार शेख अब्दुल रहमान हाजी बाबू अब्दुल रशीद

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार -मुख्यमंत्री फडणवीस




## आयआयएमयूएन आयोजित 'युथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत. मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णत: बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. 'मुंबई वन' हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळापेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# संतापजनक! प्रसुत महिलेला रुग्णवाहिका चालकाने अर्ध्यावरच सोडलं; मातेची चिमुकल्यासह २ किमी पायपीट

**पालघर । प्रतिनिधी**


राज्यातील महिलांच्या आरोग्यासाठी, गर्भवती महिला आणि बालसंगोपनासाठी सरकार योजना राबवते. मात्र, दुसरीकडे अद्यापही गर्भवती महिलांना रुग्णालयात पोहोचण्यासाठी जीवाचा आटापिटा करावा लागतो, गर्भवती महिलांच्या प्रसुतीसाठी ग्रामीण भागात, आदिवासी पाड्यात व्यवस्थाच नसल्याने रुग्णांचे मोठे हाल होताना दिसून येतात. त्यातच, आता पालघर जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यातील धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका पाड्यावरली गर्भवती महिलेला



चक्क घनदाट जंगलात सोडून रुग्णवाहिका चालक निघून गेल्याची चीड आणणारी घटना समोर घडली. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून संबंधित रुग्णवाहिका चालकावर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यातील अति दुर्गम असलेल्या आमला गावातील प्रसूत महिलेला अर्धवट रस्त्यात सोडून रुग्णवाहिका गेल्याने प्रसूत महिलेच्या कुटुंबीयांनी बाळाला घेऊन दोन किलोमीटर पायपीट केल्याची हृदयद्रावक आणि तितकीच संतापजनक घटना घडली. प्रसूत महिला सविता बारात सासरचे नाव सविता बांबरे हिला बुधवार १९ नोव्हेंबर रोजी मोखाडा ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आले होते. त्यानंतर तिला काही कारणास्तव जव्हार कुटीर रुग्णालयात पाठविण्यात आले, तिची प्रसूती सुखरूप झाली. रविवार २४ नोव्हेंबरला तिला रुग्णवाहिका देऊन घरी पाठविण्यात आले. मात्र, रुग्णवाहिका चालकाने त्यांना गावापासून दोन किलोमीटर रस्त्यावर घनदाट जंगलाच्या ठिकाणी उतरवून ती रुग्णवाहिका निघून गेली. प्रसूत महिला सविता बारात हिच्यासोबत आई व सासूबाई होत्या, त्यांना बाळाला व प्रसूत महिलेला दोन किलोमीटर पायपीट करावी लागली. या सर्व घटनेचा त्यांच्या कुटुंबाने संताप व्यक्त केला आहे. प्रसूत महिलेच्या जीवाला काही झाले असते तर त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न त्यांच्या कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे. जव्हार मोखाड्यात सध्या बिबट्यांचा वावर आणि हल्ले वाढत असतानाच अशा पद्धतीने निर्जनस्थळी एका प्रसुती मातेसह तिच्या नवजात बालकाला सोडन रुग्णवाहिकेचा चालक निघून जातो हा प्रकार धक्कादायक आणि हादरवणारा असल्याने नागरिकांकडून सध्या संताप व्यक्त करण्यात येतोय. तसेच, संबंधित रुग्णवाहिका चालकावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही स्थानिकांकडून केली जात आहे.

### बॉलिवूडचा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड...

# सुपरस्टार धर्मेंद्र यांच निधन ८९ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास




**मुंबई । प्रतिनिधी**

बॉलिवूडचा 'ही-मॅन' सुपरस्टार, हँडसम हंक धर्मेंद्र यांनी वयाच्या ८९व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून प्रकृती अस्वास्थामुळे धर्मेंद्र यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू होते. तब्येत खालावल्यामुळे धर्मेंद्र यांना साधारणतः बारा दिवसांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. त्यानंतर धर्मेंद्र यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आलेला. तेव्हापासून ते घरीच होते. पण, अखेर त्यांच्या जुहूतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. धर्मेंद्र यांच्या प्रकृती अस्वास्थापासूनच वेगवेगळ्या बातम्या माध्यमांमध्ये पसरत होत्या. अनेक अफवाही पसरलेल्या. अद्याप देओल कुटुंबीयांनी धर्मेंद्र यांच्या मृत्यूबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. पण, मिळालेल्या माहितीनुसार, धर्मेंद्र यांच्यावर अंत्यसंस्कारही करण्यात आलेत. तब्बल सहा दशकं सिनेसृष्टीवर राज्य करणारा कोहिनूर हरपल्यानं मोठी पोकळी निर्माण झाली आहे. धर्मेंद्र यांच्या निधनानं अख्खं बॉलिवूड शोकसागरात बुडालं आहे. धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी ब्रिटिश भारतातील पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील नसराली या गावी झाला. आपल्यापैकी अनेकांना ठाऊक नसेल की, त्यांचं खरं नाव केवल कृष्ण देओल होतं.

# शेवटपर्यंत भूमिकेशी एकनिष्ठ राहून लोकांसाठीच काम करणार : आ.संदीप क्षीरसागर

## नगरपरिषद निवडणूक प्रचारात तुतारीला उत्स्फूर्त जनसमर्थन

**बीड । प्रतिनिधी**

आम्ही भूमिकेशी कधीही तडजोड करणार नाही, शेवटपर्यंत भूमिकेशी आणि पुरोगामी विचारांशी एकनिष्ठ राहून लोकांसाठी कायम रस्त्यावर काम करू. आमचे सर्व उमेदवार हे लोकांसाठी उपलब्ध असणारे आहेत त्यामुळे मोठ्या मताधिक्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन आ. संदीप



क्षीरसागर यांनी मतदारांना केले. शनिवारी (दि.२२) रोजी बीड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ.स्मिताताई वाघमारे व वॉर्ड क्रमांक १५ चे उमेदवार पंकज बाहेगव्हाणकर, मनिषाताई आगे आणि वॉर्ड क्रमांक २२ चे उमेदवार शेख सुमैय्या शेख वसीम, शेख शमशीर शेख फेरोज यांच्या प्रचारार्थ शहरातील मित्रनगर व मिल्लतनगर भागात कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मित्रपक्ष शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांच्यासह या भागातील हजारो नागरिक उपस्थित होते.

# शिवसेना शिंदे गटाच्या आंदोलनाला अखीर यश आज पासून शेतकऱ्यांना मिळणार दिवसा लाईट



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना नेते शेतकरीपुत्र आपला भाऊ हरिभाऊ शेळके सोबत सरपंच अशोक वाघमारे माझी सरपंच रामहरी हाडूळे मागील काही दिवसापासून बिबट्याचा सुळसुळाट आणि शेतकरी वर्गातील भीतीच वातावरण पाहता एम एस सी बी चा हा गलथान कारभार बघून एम एस सी बी ने शेतकऱ्यांना रात्रीची वीज सोडून रात्री अपरात्री शेतीला पाणी देण्यासाठी त्यांना स्वतः च्या जीवाशी जीवघेणा खेळ खेळत रात्री अपरात्री शेतीला पाणी देण्यासाठी जावे लागत होतं हा सगळा एम एस सी बी चा नाकारतेपणा पाहूनशेतकरी पुत्र आपला भाऊ हरिभाऊ शेळके यांनी वारंवार शेतकऱ्याची व्यथा एमएसईबी ला सांगूनही मागील आठ ते दहा दिवसापासून हरिभाऊ शेळके हे एम एस सी बी कार्यालयात वारंवार जाऊनही त्यांनी शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यास मनाई करत होते म्हणून आज हरिभाऊ शेळके यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप शिंदे गट यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलनाचा पवित्रा स्वीकारला आणि धडक आंदोलन सब स्टेशन शिवनी येथे केले आणि त्या आंदोलनाला यश म्हणून माझ्या भागातील शेतकरी आज सुखी झाला आणि उद्यापासून वीज सकाळी सहा वाजल्यापासून सोडण्याचा शब्द एम एस सी बी प्रशासनाने दिला

# 'बे दुणे तीन' ५ डिसेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीस; ZEE5 प्लॅटफॉर्मवर ओरिजिनल मराठी मालिका

**ठाणे । प्रतिनिधी**

मराठी मनोरंजनासाठी लोकप्रिय असलेल्या मराठी नएए५ प्लॅटफॉर्मने आपल्या आगामी ओरिजिनल मालिका 'बे दुणे तीन' चा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. ही मालिका ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रीमियर होणार असून आधुनिक नातेसंबंधांतील गोंधळ, भावनिक चढ-उतार आणि हळुवार विनोदाने सजलेली कथा यातून अनुभवायला मिळणार आहे.

दीक्षा केतकर, विराजस कुलकर्णी, शुभांकर एकबोटे, क्षितीश दाते, पुष्करराज चिरपुटकर आणि शिवाणी रांगोळे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेत अभय आणि नेहा या तरुण दाम्पत्याच्या आयुष्यात एकाच वेळी तीन बाळं होणार असल्याची धक्कादायक माहिती मिळाल्यानंतर सुरू होणारी मजेदार अनागोंदी दर्शविण्यात आली आहे. दिग्दर्शक अथर्व सौंदणकर व हिमांशू पिले, तर निर्मिती वृषांक प्रॉडक्शन्स यांनी केली आहे. या मालिकेची कथा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य अशा तीन कालपटांवर पुढे सरकत जोडप्यांच्या आयुष्यातील भावनिक नातेसंबंध, पालकत्वाची जबाबदारी आणि एकमेकांवरील प्रेमाचा प्रवास उलगडते. नात्यातील विनोद, गोड-तिखट प्रसंग आणि वास्तववादी अभिनय यांचा सुरेख संगम 'बे दुणे तीन'मध्ये दिसून येतो.

मराठी नएए५ च्या बिझनेस हेड हेमा व्ही.आर. म्हणाल्या, महाराष्ट्रीयन घरांतील मनाला भिडणाऱ्या आणि वास्तवाशी निगडित कथा प्रेक्षकांसमोर आणण्यात आम्हाला अभिमान वाटतो. 'बे दुणे तीन' ही मालिका त्याचेच उत्तम उदाहरण आहे. अभय-नेहाचा प्रवास हा प्रेम, सोबत आणि पालकत्वातील नात्यांवरील आपुलकी यांचा अनोखा संगम आहे. प्रेक्षक या कथेशी जोडले जातील, असा आम्हाला विश्वास आहे. वृषांक प्रॉडक्शन्सच्या प्रतिनिधींनी सांगितले की, एका जोडप्याला एकाचवेळी तीन बाळं होणार असल्याची कल्पना ही आयुष्याच्या अनिश्चिततेचे प्रतीक आहे. या कथेत विनोद, भावना आणि वास्तव यांचे सुंदर मिश्रण दिसते. नएए५ सोबतची आमची ही निर्मिती प्रेक्षकांच्या मनात घर करेल, याची आम्हाला खात्री आहे. दिग्दर्शक अथर्व सौंदणकर व हिमांशू पिले म्हणाले की, अभय-नेहाचे नाते हे वास्तववादी, दोषांसह पण प्रेमाने परिपूर्ण असे आहे. त्यांच्या गोंधळलेल्या आयुष्यातील हसरे, भावनिक आणि आत्मीय क्षण प्रेक्षकांना भिडतील. अभयची भूमिका साकारणारे क्षितीश दाते म्हणाले, ही मालिका वास्तवाशी खूप जवळची वाटते. तीन बाळांचा वडील होण्याची अचानक आलेली जबाबदारी, भावनिक गोंधळ आणि हळवे क्षण हा एक अनोखा अनुभव आहे. प्रत्येक जोडपे स्वतःचे प्रतिबिंब या कथेत पाहील.



# व्यवसाय करतोय: आज हसणारे उद्या म्हणतील... पोऱ्यानं बापाचं नाव मोठं केलं!

व्यवसायाची वाट म्हणजे निव्वळ पैसा, नफा किंवा तोटा नाही-ती स्वतःचा मार्ग घडवण्याची, स्वतःचा चेहरा बनवण्याची, आणि घरच्यांना अभिमान वाटेल अशी ओळख निर्माण करण्याची यात्रा आहे. आज ज्या जगात सुरक्षित नोकरीपेक्षा जोखीम असलेला व्यवसाय निवडतो, तो माणूस घरच्यांच्या नजरेत आधी प्रश्नचिन्ह बनतो. नातेवाईकांची कुजबुज, मित्रांचे तिरपे नजरांचे कोपरे, आणि घरातील संभ्रम-हे सगळं त्याला रोज सामोरं जायचं असतं. पण या प्रवासात एक गोष्ट मात्र ठाम असते-उद्याच्या दिवशी हेच लोक म्हणणार, या पोरानं खरंच नाव मोठं केलं.



व्यवसायात पहिले पाऊल टाकताना पाय थरथरतात, मनात भीती बसते, आणि कुटुंबातले लोक नेहमीच सुरक्षित मार्गाची चर्चा करतात. नोकरी कर, स्थिर राहशील, हा सल्ला किती वेळा ऐकून झाला! पण मनातली आग शांत बसत नाही. उद्योजक तेच होतात ज्यांना आपली स्वप्नं कशाचंही ऐकून तडजोड करू देत नाहीत. सुरुवातीला व्यवसायात नफा दिसत नाही. ग्राहक मिळत नाहीत, बाजार समजत नाही, चुका सतत होतात. घरच्यांना वाटतं-हे असं किती दिवस चालणार? काहीतरी स्थिर करावं. पण उद्योजक मात्र हरत नाही. कारण त्याला स्वतःवर आणि स्वतःच्या स्वप्नांवर अभेद्य विश्वास असतो. हा विश्वासच त्याला पुन्हा उभं करतो. पहिल्या वर्षात अनेकदा असे क्षण येतात जेव्हा वाटतं-नोकरी केली असती तर बरं झालं असतं. पण त्याच वेळी एखादा छोटा ग्राहक, एखादी छोटी प्रशंसा, किंवा पहिला छोटासा नफा यामुळे पुन्हा जिद्दीला उधाण येतं. कारण व्यवसाय ही मनाने मजबूत लोकांची परीक्षा आहे. या प्रवासात घरच्यांचा समजूतदारपणा नेहमीच नसतो, पण त्यांचं प्रेम असतं. हळूहळू त्यांना तुमची धडपड दिसते. त्यांच्या भीती कमी होऊ लागतात. त्यांना दिसू लागतं की तुम्ही फक्त व्यवसाय नाही करत-तुम्ही घराची ओळख निर्माण करत आहात. कार्यालयातल्या निराशेपासून ते बाजारपेठेतील स्पर्धेपर्यंत, प्रत्येक दिवस एक नवा धडा असतो. चुका तुमच्या वाढीचे शिक्षक बनतात. आणि मग एक दिवस तीच चूक तुम्हाला यश मिळवून देणारी रणनीती ठरते. उद्योजकतेत सर्वात मोठी शक्ती म्हणजे सातत्य. जे रोज पडूनही उठतात, तेच एक दिवस लांबचा प्रवास करतात. समाजाला तेव्हा कळतं की हा मुलगा फक्त स्वप्न पाहणारा नाही-त्याला त्या स्वप्नांवर काम करायला देखील येतं. जेव्हा तुमचं नाव ग्राहकांच्या तोंडी येतं, जेव्हा कामाची गुणवत्ता तुम्हाला वेगळं ओळख देऊ लागते, तेव्हा हळूहळू घरातला विश्वास वाढायला लागतो. माझा मुलगा व्यवसाय करतो हे वाक्य घरातल्या मोठ्यांच्या आवाजात प्राउडनेस निर्माण करू लागतं. काही वर्षांनी जेव्हा तुमचं काम स्थिर होतं, व्यवसाय वाढतो, तेव्हा तेच लोक जे आधी शंका घेत होते ते सुद्धा म्हणतात-अरे, त्यानं खरंच करून दाखवलं. हे शब्द म्हणजे उद्योजकासाठी सर्वोच्च पुरस्कार असतात.

व्यवसायात पैसा येतो किंवा जातो-पण तुमची ओळख कायम राहते. कारण तुम्ही निर्माण केलेलं काहीतरी असतं. नोकरीत बसून दुसऱ्यांचे स्वप्न पूर्ण होत असतात; व्यवसायात स्वतःची इमारत उभी होते.

आणि मग एक दिवस असा येतो की बापाच्या चेहऱ्यावरचा अभिमान दिसतो. तो शांतपणे, काही न बोलता, फक्त तुमच्याकडे पाहतो-आणि त्या नजरेत खूप काही सांगून जातो. त्या नजरेला शब्दांची गरज नसते. कारण बापाला दिसलेला तो अभिमानच तुमचं खरं यश असतं. ही यात्रा केवळ पैसे कमावण्याची नसते; ती घराण्याचा मान वाढवण्याची असते. जेव्हा समाज म्हणतो, या पोरानं खरंच बापाचं नाव मोठं केलं, तेव्हा तुमचा व्यवसाय फक्त व्यावसायिक यश नाही-ती तुमची परंपरा बनते.

एकुणच , व्यवसाय करणं म्हणजे जोखीम घेणं, संघर्ष करणं, आणि रोज स्वतःला सिद्ध करणं. पण या प्रवासाचा सर्वोच्च क्षण तोच असतो-जेव्हा कुटुंब, समाज आणि नातेवाईक एकच वाक्य उच्चारतात: पोऱ्यानं खरंच नाव मोठं केलं. उद्योजकता ही फक्त करिअर नाही-ती आपल्या घराण्याच्या इतिहासात आपलं पान निर्माण करण्याची संधी आहे. तुम्ही तो मार्ग निवडला आहे-आणि जग एक दिवस तुमचा अभिमानाने उल्लेख करणार आहे.

-डॉ. भारत कऱ्हाड,
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## नात्यातील मुलाने साडेपाच वर्षीय मुलीवर केला

### गुन्हा दडपण्याचा गावकऱ्यांचा प्रयत्न



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. साडेपाच वर्षाच्या चिमुरडीवर नात्यातीलच एका मुलाने लैंगिक अत्याचार केल्याच उघड झालं असून या घटनेने खळबळ उडाली आहे. त्याहूनही आणखी धक्कादायक बाब म्हणजे गावकऱ्यांनी बदनामीच्या भीतीने पीडितेच्या आईवर गुन्हा दडपण्याचा दबाव आणल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ११ नोव्हेंबर रोजी ही अत्याचाराची घटना घडली. परंतु, घटनेनंतर तब्बल चार दिवस गावातील लोकांनी मुलीला उपचारासाठी रुग्णालयात जाऊ दिले नाही. बदनामी होऊ नये म्हणून ग्रामस्थांनी चक्क बैठका घेऊन गुन्हा दडपण्याचा प्रयत्न केला. या कालावधीत चिमुरडी अतोनात वेदना सहन करत होती. तिच्या नात्यातील काही व्यक्तींना ही गंभीर बाब समजल्यानंतर त्यांनी थेट पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर शिरूर कासार पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला. चार दिवसांच्या विलंबानंतर अखेर मुलीच्या आईने सर्व दबाव झुगारून उपचारासाठी बीड येथील सरकारी रुग्णालयात धाव घेतली. पीडित चिमुरडीवर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून तिची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणातील सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे अत्याचार करणारा व्यक्ती हा पीडित मुलीचाच नात्यातील असल्याचे समोर आले. गावकऱ्यांनी बदनामी टाळण्यासाठी पीडित कुटुंबाला धमकावले. ही आपबीती सांगताना मुलीची आई हृदयविदारक अवस्थेत रडू लागली. बालकल्याण समितीचे सदस्य तत्वशील कांबळे यांनी स्पष्टपणे सांगितले की, पोस्को कायद्यानुसार गुन्हा तात्काळ नोंदवणे अत्यावश्यक आहे. ▶ उर्वरित पान २ वर

# स्मिता विष्णू वाघमारे यांना समाज बांधवांचा पाठिंबा

## बीड शहरातील आंबेडकरी समाज बांधवांच्या निर्णायक बैठकीत निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेसाठी मागासवर्गीयांना आलेली अध्यक्ष पदाची संधी डावणाऱ्या सत्ताधारी प्रस्थापितांना व अजित पवार गटाला धडा शिकविण्यासाठी आज रोजी हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे बीड शहरातील आंबेडकरवादी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांची



निर्णायक बैठक घेऊन स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी जोपासत समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून लढा उभा करण्याचे काम करणाऱ्या दलित चळवळीतील पदाधिकाऱ्यांना उमेदवारी डावलून समाजाशी कसलीही बांधिलकी नसणाऱ्या व आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी जाहीर करून ४० वर्षानंतर आम्हाला मिळालेली राजकीय संधी हिरावून घेऊन मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याचे काम अजित पवार यांनी केले आहे. आंबेडकरी समाज बांधवांच्या बैठकीत पप्पूजी कागदे, अजिंक्य चांदणे, बबन वडमारे, राहुल मस्के, वसंतराव ओगले, ▶ उर्वरित पान २ वर

### ● काळ्या फिती तोंडाला बांधून अजित पवारांचा निषेध

**बीड नगर परिषद निवडणूकीत अजित पवार गटाने आंबेडकरी समाजाला, ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने, आंबेडकरी समाज बांधवांकडून तोंडाला, काळ्या फीती बांधनू जाहीर निषेध केला.**

# जातीपातीच्या समीकरणावर नाही, विकासाच्या मुद्यावर आम्ही निवडणूक जिंकणार: आ.संदीप क्षीरसागर

### ● प्रत्येक वॉर्डात मतदारांची तुतारीलाच पसंती

**बीड । प्रतिनिधी**

जातीपातीच्या समीकरणावर नाही तर विकासाच्या मुद्यावर आम्ही निवडणूकीला सामोरे जात आहोत. कितीही प्रयत्न केला तरी बीडमधील सलोखा बिघडणार नाही. असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला. वॉर्ड क्रमांक १,८ आणि १९ मधील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना



उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत ते बोलत होते. बीड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार असलेल्या स्मितााताई विष्णू वाघमारे तसेच वॉर्ड क्रमांक ०१ येथील उमेदवार अशोक मारूती काळे, बबिता सुधाकर जाधव यासह वॉर्ड क्रमांक १९ मधून उमेदवार असलेले शोएब हाफिजोद्दीन इनामदार, मिराबाई विठ्ठल जाधव आणि वॉर्ड क्रमांक ८ मधील मनिषा उल्हास गिराम, सय्यद अशफाक सय्यद मोहम्मद सिद्दीक यांच्या प्रचारार्थ, बीड शहरातील शहूनगर, खडकपूरा आणि बुंदेलपुरा भागात कॉर्नर सभांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रत्येक सभांना हजारो मतदार बांधव उपस्थित होते.

# अजित दादा पुण्याच्या वैष्णवीला न्याय देता आला नाही निदान प्रेमलता पारवेंच्या सुनेला तरी द्या !

## सुनेवर अन्याय करणाऱ्या प्रेमलता पारवे बीड शहराला न्याय काय देणार ?

**बीड । प्रतिनिधी**

अजित दादा..! विकासाच्या गप्पा बीडकरांनी भरपूर ऐकल्या तुमच्या पक्षाचे मुळशी तालुका अध्यक्ष राजेंद्र हगवणेंची सून वैष्णवी हगवणे हिने कौटुंबिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. तशीच घटना बीडमध्ये देखील तुमच्या नगरपालिकेच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्या बाबतीतही होत आहे. ज्या स्वतःच्या सुनांना न्याय देऊ शकत नाही त्या बीडच्या जनतेचं भलं काय करणार ? त्यांना न्याय काय देणार ? असा प्रश्न विचारला जात आहे. तुमच्याच नशिबाला अशी लोक का येतात ? असा देखील प्रश्न निर्माण झाला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने



यावेळी बीड नगरपालिकेत प्रेमलता पारवे यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली. प्रचारही जोरात सुरू आहे. पारवेंच्या जीवावर क्षीरसागरांची नगरपालिकेतली मक्तेदारी मोडून काढायची याचा चंग बांधला गेला. त्यासाठी दलित चळवळीत काम करणारे समाजाप्रती निष्ठावान असलेले तरुण पप्पू कागदे यांना सुरुवातीला उमेदवारीची गळ घातली. ऐनवेळी त्यांना धोका देऊन प्रेमलता पारवे यांना उमेदवारी दिली.डॉ. योगेश क्षीरसागर यांना देखील पक्षातून बाहेर पडावं लागलं. एवढा खेळ खंडोबा करत असताना उमेदवार तितका दर्जाचा आणि तोला मोलाचा असावा याचा विचार मात्र केला गेला नाही. यातूनच वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची आठवण ताजी झाली. बीडचे धडाडीचे पत्रकार संग्राम धन्वे यांनी मराठी महाराष्ट्रच्या माध्यमातून प्रेमलता पारवे यांनी सुनेवर केलेल्या अत्याचाराची घटना जनतेसमोर आणली. सुनेवर केलेल्या अत्याचाराच प्रकरण समोर आल्यानंतर बीडमध्ये खळबळ माजली. नेमके याचवेळी ▶ उर्वरित पान २ वर

# वानगाव शिवारात बिबट्या घुसला

**बीड । प्रतिनिधी**

वनविभागाच्या अक्षय मुळे हिंस्र असलेले बिबटे आता ग्रामीण भागामध्ये शिरगाव करू लागले आहेत हा बिबट्या आता बालाघाटावरील वानगाव परिसरात घुसला असून त्याने रात्री जिल्हा परिषद शाळेसमोरील हौसराव जोगदंड यांच्या शेळीचा फडशा पाडल्याने शेतकऱ्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाटोदा तालु३यामध्ये बिबट्या अनेकांना दिसला शेतकऱ्यांच्या अनेक जनावरावर त्यांनी हल्ले केले या घटना ताज्या असताना वनविभाग काही उपाययोजना करणे ऐवजी बिबट्या कुठे आहे याचा शोध बातम्या आल्यानंतरच घेतात विशेषत... हा आता बालाघाटावर ही संचार करू लागला आहे त्यामुळे शेतकऱ्यात मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे शनिवारी रात्री वाणगाव तालुका बीड येथील जिल्हा परिषद शाळेसमोर हौसराव नारायण जोगदंड यांच्या शेळीचा फडशा पाडला या घटनेमुळे वाणगाव व परिसरातील शेतकऱ्यांना भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या घटनेनंतर संबंधित तलाठ्याने याचा पंचनामा केला.

# भ्रष्टाचाराचा आहार बंद करून विकासाचा आहार पुरवण्यासाठी डॉ.संध्या मेंडकेला नगराध्यक्ष करा : ना.पंकजाताई मुंडे



### ● सत्ता आल्यास दर तीन महिन्याला बैठक घेणार–पंकजा मुंडे

**भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात माजलगाव नगर परिषदेची सत्ता आल्यास दर तीन महिन्याला नगर परिषदेची बैठक घेणार असल्याचे सांगत नगरपरिषदेच्या विकासात्मक कामाला तीव्र गती देणार असल्याचे अभिवचने त्यांनी यावेळी दिले.**

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगर परिषदेचा कारभार भ्रष्टाचाराने पोखरलेला आहे.येथे होणारा भ्रष्टाचाराचा आहार बंद करून विकासाचा उन्नतीचा आहार पुरवण्यासाठी डॉ.संध्या मेंडकेला नगराध्यक्ष करा. त्याचप्रमाणे भाजपाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार दि.२४ रोजी संध्याकाळी वैष्णवी मंगल कार्यालय येथे आयोजित प्रचार सभेत त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माजी आ.राधाकृष्ण होके पाटील, डॉ.प्रकाश आनंदगावकर, राम कुलकर्णी,संपादक शिवाजी रांजवण,अरुण राऊत, ज्ञानेश्वर मेंडके, किट्टी आडगाव मंडळाध्यक्ष रूपाली कचरे,माधव निर्मळ, अमरनाथ खुरपे, शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ.सोळंके, संजय आंधळे, डॉ.तिडके, सुमनताईमुंडे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. संध्या मेंडके, सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित सभेला मार्गदर्शन करताना नामदार पंकजाताई मुंडे म्हणाल्या की,माजलगाव नगर परिषदेत झालेलं भ्रष्टाचाराचं ▶ उर्वरित पान २ वर



# बाळनाथ विद्यालय चाकरवाडीच्या रणरागिणींचा महाराष्ट्रात विजयफटका

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यस्तरीय लंगडी स्पर्धा २०२५–२६ मध्ये बीड जिल्ह्यातील चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालय या शाळेतील चार प्रतिभावान मुली–कुमारी अनुष्का सावंत, राधिका कोकाटे, सानिका कोकाटे आणि श्रुती जगताप–यांची जिल्हा संघात निवड झाली असून त्यांनी आपल्या सुरेख व दमदार खेळाच्या जोरावर संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यस्तरावर झालेल्या या स्पर्धेत बीडच्या या मुलींनी सेमी फायनल आणि फायनलमध्ये अप्रतिम समन्वय, चपळाई आणि जिद्दीची खेळी सादर केली. ▶ उर्वरित पान २ वर

# कुक्कडगाव येथील सिंदफणां नदीपात्रामध्ये वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांना महसूल व पोलीस प्रशासनाचे ग्रीन सिग्नल

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कुक्कडगाव हे सध्या वाळू माफियांचे मोठे केंद्र बनले असून सिंदफणा नदी पात्रामध्ये परिसरातील वाळू माफिया तसेच स्थानिक वाळूमाफिया यांनी सातत्याने दिवस रात्र सिंदफणा नदीपात्रामध्ये विनापरवाना विना रॉयल्टी अवैध वाळू उपसा करण्याचे काम जोरात चालू केले तर एकीकडे पिंपळनेरचे पोलीस प्रशासन तसेच बीड तालुक्याचे तहसीलदार तसेच त्यांचे या भागाचे मंडळ निरीक्षक नुसते नावातच मोठे आहेत काम मात्र शून्य असल्याचे त्यांचे सध्या दिसत आहे तसेच या भागाचे तलाठी यांना देखील याची माहिती आहे परंतु महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाने आर्थिक पट्टी डोळ्यावर बांधल्यामुळे वाळूमाफियांना मात्र ग्रीन सिग्नल दिल्याचे समजत आहे या वाळू माफिया मुळे या भागातील नागरिक अत्यंत त्रस्त झाले असून वाळूमाफ्याचे हायवे मोठ्या वेगात रोडने धावत असतात मग या रोडने महाविद्यालयीन शाळा देखील आहेत तसेच येणारे जाणारे गोरगरीब या भागातील नागरिक रोज येणं जाणं करत असतात त्यांना या वाहनाचा अत्यंत त्रास सहन करावा लागत आहे अचानक एखाद्याचा अपघात जर झाला एखाद्याचा जीव गेला तर त्याला पिंपळनेरचे पोलीस प्रशासन जिम्मेदार आहे का बीड तालुक्याचे महसूल प्रशासन आहे हाच प्रश्न आता या भागातील नागरिकांना पडला आहे म्हणून माननीय जिल्हाधिकारी साहेब आपण स्वतः या भागाकडे लक्ष द्यावे तसेच पोलीस अधीक्षक साहेब पिंपळनेरच्या पोलीस निरीक्षकांची एकदा चौकशी करा नेमके काय चालले आहे पिंपळनेर परिसरामध्ये या भागांमध्ये बीडच्या सध्याच्या उपविभागीय पोलीस अधिकारी पोलीस उपाधीक्षक पूजा पवार मॅडम ज्यावेळेस ठाणे प्रमुख म्हणून या भागामध्ये कार्यरत होत्या त्यावेळेस एक वाळूचा खडा देखील वाळू माफिया हलवत नव्हता ▶ उर्वरित पान २ वर

# मराठवाड्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे अधिकार शरणागत यांना: महादू पवार

**तलवाडा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या असून या निवडणुकांमध्ये सर्वच राजकीय पक्ष आपली शक्ती आजमावत आहेत, कार्यरत असणाऱ्या सामाजिक क्षेत्रातील सर्वात मोठी लढाऊ संघटना म्हणून उदयास आलेल्या भीम आर्मी महाराष्ट्र या संघटनेने या निवडणुका ताकतीने लढवण्याचा निर्णय घेतला आहे, मराठवाडा मध्ये ही या निवडणुका



लढवण्यासाठी काही उमेदवार रिंगणामध्ये उतरले आहेत, अशा प्रबळ उमेदवारांच्या मागे भीम आर्मी महाराष्ट्र खंबीरपणे उभी राहणार असून मराठवाड्यातील प्रबळ उमेदवारांना जाहीर पाठिंबा मराठवाडा प्रमुख विश्वनाथ शरणागत हे जाहीर करतील त्यांना सर्व अधिकार देण्यात आल्याची माहिती भीम आर्मीचे महाराष्ट्राचे प्रमुख अध्यक्ष महादू पवार यांनी जाहीर केली आहे. विश्वनाथ शन्नागत हे भीम आर्मी संघटनेच्या स्थापनेपासून कार्यरत आहेत त्यांच्यावर सर्वांचा खंबीरपणे विश्वास असून ते जे निर्णय घेतील त्याच्या मागे संपूर्ण महाराष्ट्रातील राज्य कार्यकारिणी खंबीरपणे उभी राहील असंही महादू पवार यांनी पत्रकारांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकामध्ये म्हटले आहे. मराठवाड्या विभागातील संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, जालना, आधी जिल्ह्यामध्ये भीम आर्मी संघटना ताकतीने काम करीत आहे. जनतेचे प्रश्न प्रशासकीय पातळीवर लढते आहे, यावर्षी मराठवाड्यामध्ये अतिवृष्टी ▶ उर्वरित पान २ वर

# ऊस दरवाढीवरून माजलगावातील शेतकरी आक्रमक...

## सात तासां चक्काजाम नंतर आंदोलन स्थगित... ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संतप्त भावना... आज जिल्हाधिकारी, कारखान्याचे एमडी यांच्या सोबत युवा शेतकरी संघर्ष समितीची बैठक

**माजलगाव । प्रतिनिधी**

ऊसदरवाढी वरून माजलगाव मध्ये दि. २४ नोव्हेंबर सोमवार रोजी वसंतराव नाईक चौक माजलगाव ( परभणी फाटा) येथे शेतकऱ्यांनी चक्काजाम आंदोलनाचे आयोजन केले होते. या चक्काजाम आंदोलनास शेतकरी वर्गाने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला होता. या चक्काजाम आंदोलनादरम्यान शेतकऱ्याकडून उसाला चार हजार रुपये प्रति टन भाव मिळावा अशी प्रमुख मागणी



उपस्थित केली जात होती. उसदराचा पहिला हप्ता ३०००/–पये द्यावा व उर्वरित ऊस बिलाचे पैसे नंतर द्यावेत अशी मागणी युवा शेतकरी संघर्ष समिती कडून करण्यात आली.

ऊसदर वाढीवरून माजलगाव तालुक्यातील शेतकरी आक्रमक झालेला आहे. जोपर्यंत उसाचा दर वाढला जात नाही तोपर्यंत हे चक्का जाम आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय युवा शेतकरी संघर्ष समिती कडून घेण्यात आला होता परंतु प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करत आज दि. २५ ▶ उर्वरित पान २ वर

- **शेतकऱ्यांची प्रमुख मागणी उसाला ३००० ते ४००० रुपये पहिली उचल तात्काळ जाहीर करा... शेतकऱ्यांचा एकच ठाम आग्रही होते.**
- **तोडगा निघाला नाही तर कोयता बंद' ऊस पुरवठा पूर्णतः रोखण्याचा इशारा – शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, दरात योग्य वाढ न झाल्यास ऊसाची तोड बंद करून कारखान्यांकडे जाणारा ऊस पुरवठा पूर्णपणे थांबवण्याची तयारी आहे. शेतकऱ्यांच्या ह्या भूमिकेमुळे कारखानदार आणि प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला आहे.**
- **शाळेतील विद्यार्थी म्बुलन्स यांना आंदोलकांनी रस्ता मोकळा करून दिला – आंदोलनादरम्यान अंबुलन्स व शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्कूल बस आल्या त्यांना आंदोलकांनी रस्ता मोकळा करून दिला. त्यांचे हे कार्य अतिशय कौतुकास्पद आहे.**
- **माजलगाव येथील स्थानिक कारखानदार असतानाही या आंदोलनाकडे कारखानदाराचा एकही प्रतिनिधी फिरकला नसल्याने आंदोलकांमध्ये संतप्त भावना निर्माण झाले आहेत.**